माहे नोव्हेंबर २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ३ नगरपरिषदा व ६५ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम २०२०

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र


क्रमांक-रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.६/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.

दिनांक:- २३ डिसेंबर, २०२०.

संदर्भ :- १) आयोगाचा समक्रमांकाचा दि.१२/१०/२०२० चा प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम.
२) आयोगाचा समक्रमांकाचा दि.१३/११/२०२० चा सुधारीत कार्यक्रम.
३) जिल्हाधिकारी अमरावती यांचे पत्र क्र. कक्ष-२०/नविशा/कर व प्रशा/आस्था/कावि/५३७/२०२०, दि.१५/१२/२०२०.

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए मधील तरतुदीनुसार नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची सूपर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. आणि ज्याअर्थी, भारतीय संविधान व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे आवश्यक आहे.

३. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाचे नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम २०२० नुसार धारणी नगरपंचायत जिल्हा अमरावती च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचनेच्या अनुषंगाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती या प्रवर्गातील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग त्या मधील महिला तसेच सर्वसाधारण महिला यांची सोडत चुकीची काढलेली आहे, ही बाब नियमानुसार झालेली नाही. त्यामुळे सोडतीची प्रकिया पूर्णपणे बाधीत झालेली आहे.

४. आणि ज्याअर्थी, आरक्षणाच्या अनुषंगाने सोडतीची प्रक्रिया चुकीची झाल्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती या प्रवर्गातील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) याबाबतची संपूर्ण सोडत नव्याने घेणे आवश्यक आहे. सदरची चूक २०२० निवडणुकीतील आरक्षण व चक्राकार यावर परिणामकारक असून भविष्यातील निवडणुकीच्या आरक्षणावर देखील परिणामकारक आहे.

५. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग सांविधानिक जबाबदारी पार पाडत असताना अशी चूक निदर्शनास आली व तिचा या निवडणुकीवर तसेच भविष्यातील निवडणुकीवर परिणाम होणार असल्याने सदर चुकीकडे दुर्लक्ष न करता सदर चुकीची तात्काळ दुरूस्ती करणे योग्य व न्यायिक आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे.

६. आणि त्याअर्थी, संविधानातील २४३ झेडए व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० व १० अ (४) मधील प्राप्त अधिकाराचा वापर करून, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत:-

## आदेश

i) राज्य निवडणूक आयोगाने धारणी नगरपंचायत जिल्हा अमरावती या स्थानिक स्वराज्य संस्थेचा सन २०२० सार्वत्रिक निवडणुकीचा दि.१२/१०/२०२० रोजी निर्गमित केलेला प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम २०२० मधील परिशिष्ट-१ मधील टप्पा क्र. अ (४) मध्ये सोडतीच्या प्रक्रियेमध्ये झालेल्या चुकीमुळे, सदर टप्पा क्र. अ (४) मधील आरक्षणाच्या सोडतीपासून पुढील टप्प्यांची कार्यवाही व आयोगाच्या दि.१३/११/२०२० रोजीच्या कार्यक्रमासोबतच्या परिशिष्ट-१ मधील कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

ii) धारणी नगरपंचायत जिल्हा अमरावतीच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता प्रभाग रचना व आरक्षणाच्या अनुषंगाने नव्याने सोडतीचा कार्यक्रम सोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये दर्शविल्याप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. दि.१२/१०/२०२० रोजीच्या प्रभाग रचना कार्यक्रमाअंतर्गत प्राप्त झालेल्या हरकती या नव्याने प्राप्त होणाऱ्या हरकतींसह सुधारित कार्यक्रमाअंतर्गत अंतिम प्रभाग रचना करताना विचारात घेण्यात याव्यात.

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१) प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३) विभागीय आयुक्त, अमरावती व जिल्हाधिकारी, अमरावती.
४) मुख्याधिकारी, धारणी नगरपंचायत.
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने.
६) राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये नेमलेले वकील.
७) निवड नस्ती, का-६.

# परिशिष्ट-१

## धारणी नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२०-२१

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.६/का.६ दि. २३/१२/२०२० सोबतचे सहपत्र)

## सोडत, प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी, हरकती व सूचना तसेच सुनावणी व अंतिम प्रभाग रचना प्रसिध्दी इत्यादिचा सुधारित कार्यक्रम

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे **(जिल्हाधिकारी व नगर पंचायत वेबसाईटसह)** | जिल्हाधिकारी | २८/१२/२०२० (सोमवार) |
| २. | नगरपंचायतीच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | ३०/१२/२०२० (बुधवार) |
| | **ब) हरकती व सूचना मागविणे तसेच सुनावणी देणे** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांच्या आरक्षणाची अधिसूचना (कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी हरकती व सूचना मागविणेकरिता वेबसाईवर उपलब्ध असल्याबाबत स्थानिक वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतीच्या वेबसाईटवर नोटीस प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | ०४/०१/२०२१ (सोमवार) पर्यंत |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | ०४/०१/२०२१ (सोमवार) ते ११/०१/२०२१ (सोमवार) पर्यंत |
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | १३/०१/२०२१ (बुधवार) पर्यंत |
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन **अमरावती विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन,** यांचेकडे अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी | १५/०१/२०२०१ (शुक्रवार) पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | विभागीय आयुक्त, अमरावती | १९/०१/२०२१ (मंगळवार) पर्यंत |
| **क) अंतिम प्रभाग रचना** **(प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या तसेच आरक्षणासह)** | | | |
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना प्रसिध्द करुन त्याची सूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | २१/०२/२०२१ (गुरुवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक-रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.६/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २९ डिसेंबर, २०२०.

प्रति,
जिल्हाधिकारी,
अमरावती.

विषय :- धारणी नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२०-२१
प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा सुधारित कार्यक्रम....

संदर्भ :- आयोगाचा समक्रमांकाचा दि.२३/१२/२०२० रोजीचा प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा सुधारित कार्यक्रम.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रातील विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, **धारणी** नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता सोडत, प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी, हरकती व सूचना तसेच सुनावणी व अंतिम प्रभाग रचना प्रसिध्दी इत्यादिचा सुधारित कार्यक्रम आयोगाकडून दिनांक २३/१२/२०२० रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमातील टप्पा क्रमांक **क** (१) मधील अंतिम अधिसूचना प्रसिध्द करुन त्याची सूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबतचा दिनांक हा चुकून २१/०२/२०२१ असा चुकीचा नमूद झाला आहे. तरी त्याऐवजी सदर दिनांक हा २१/०१/२०२१ असा वाचण्यात यावा ही वंनती.

आपला,
(संजय सावंत) २९/१२/2020
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) विभागीय आयुक्त, अमरावती यांना माहितीसाठी अग्रेषित.
२) मुख्याधिकारी, धारणी नगरपंचायत, धारणी यांना माहितीसाठी रवाना.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक-रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.६/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २९ डिसेंबर, २०२०.

प्रति,
जिल्हाधिकारी,
अमरावती.

विषय :- धारणी नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२०-२१
प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा सुधारित कार्यक्रम....

संदर्भ :- आयोगाचा समक्रमांकाचा दि.२३/१२/२०२० रोजीचा प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा सुधारित कार्यक्रम.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रातील विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, **धारणी** नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता सोडत, प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी, हरकती व सूचना तसेच सुनावणी व अंतिम प्रभाग रचना प्रसिध्दी इत्यादिचा सुधारित कार्यक्रम आयोगाकडून दिनांक २३/१२/२०२० रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमातील टप्पा क्रमांक **क** (१) मधील अंतिम अधिसूचना प्रसिध्द करुन त्याची सूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबतचा दिनांक हा चुकून २१/०२/२०२१ असा चुकीचा नमूद झाला आहे. तरी त्याऐवजी सदर दिनांक हा २१/०१/२०२१ असा वाचण्यात यावा ही वंनती.

आपला,

(संजय सावंत) २९/१२/2020
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) विभागीय आयुक्त, अमरावती यांना माहितीसाठी अग्रेषित.
२) मुख्याधिकारी, धारणी नगरपंचायत, धारणी यांना माहितीसाठी रवाना.